**महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावरील हजेरीपटाचा कालावधी...**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-मग्रारोहयो२०१०/प्र.क्र.५४/रोहयो-१०
मंत्रालय मुंबई -४०० ०३२
दिनांक : २८ जून, २०१०.

पहा :
१) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्रमांक-२०८७/३१६/इएमपर-६, दिनांक ३.८.१९८७.
२) केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ अन्वये मार्गदर्शक सूचना तिसरी आवृत्ती- २००८.
३) शासन निर्णय, नियोजन विभाग,क्र. मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/ रोहयो- १०, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.
४) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/ रोहयो- १०, दिनांक १३ मार्च, २००८.
५) शासनाचे पत्र क्र. मग्रारोहयो २००८/प्र.क्र.४९/भाग-२/रोहयो-९, दिनांक १८ मे, २०१०. (सोबत केंद्र शासनाचे स्टेट नोडल ऑफीसरांच्या बैठकीचे इतिवृत्त.)
६) केंद्र शासनाचे दिनांक ११ मे, २०१० चे पत्र.

**<u>शासन परिपत्रक :</u>**

संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ३.८.१९८७ च्या आदेशानुसार रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजूरांच्या हजेरीपटाचा कालावधी १५ दिवसांचा निश्चित करण्यात आला आहे. सर्व जिल्हयांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना लागू झाल्यानंतरही हजेरी पटाच्या कालावधीत बदल केलेला नाही. तथापि आता केंद्र शासनाने दिनांक ५ मे २०१० रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत हजेरी पटाचा कालावधी ६ दिवसांचा करण्यात यावा अशा सूचना दिलेल्या आहेत. सदर बैठकीचे कार्यवृत्त सम क्रमांकाच्या दिनांक १८ मे २०१० च्या पत्राद्वारे सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी आणि सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवण्यात आले आहे. केंद्र शासनाचे सुधारित निदेश विचारात घेता हजेरी पटाच्या कालावधीत बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. त्यानुसार आता असे आदेश देण्यात येत आहेत की, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व कामांचे हजेरीपट ६ दिवसांचे करण्यात यावेत. ६ दिवसानंतर हजेरीपट बंद करुन त्याच दिवशी कामाचे मोजमाप करण्यात यावे आणि त्या कामाची मजूरी १५ दिवसामध्ये मजूरांना अदा केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या परिपत्रकातील सूचना सर्व ग्रामपंचायती आणि यंत्रणा यांच्या तात्काळ निदर्शनास आणाव्यात आणि त्यानुसार कार्यवाही करण्याचे निदेश द्यावेत.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात आला असून याचा संगणक सांकेतांक क्र. २०१००६२८१४०७३२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बा.बा.नारायणकर)
उप सचिव,नियोजन विभाग

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व)
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व मुख्य कार्यकारी. अधिकारी, जिल्हा परिषद
१०. सचिव (रोहयो) / मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
११. सर्व कक्ष अधिकारी/अवर सचिव/उप सचिव, रोहयो प्रभाग
१२. कक्ष अधिकारी, रोहयो-१ सारसंग्रहासाठी.
१३.निवड नस्ती / रोहयो-१०.